भा. कृ. अनु. प.- केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर

ICAR-central Institute for Cotton Research, Nagpur

An ISO 9001:2015 Certified Organisation

# कापूस हंगाम २०२५-२६: साप्ताहिक सव्वीसावा पीकसल्ला

## २४ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२५

| महाराष्ट्र | | मागील आठवड्यातील प्रत्यक्ष पाऊस (मिमी) | | | | | | पडणाऱ्या पावसाचा अंदाज (मिमी) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोव्हेंबर | | | | | | नोव्हेंबर | | | | |
| | | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
|  | धुळे | | | | | | | 0 | 0.2 | 0.1 | 0.1 | 0.2 |
| | नंदुरबार | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 | 0.1 | 0.1 |
| | जळगाव | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.2 | 0.2 | 0.1 | 0.2 |
| | अहमदनगर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.2 | 0.2 | 0 | 0.1 |
| | औरंगाबाद | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.2 | 0.2 | 0.1 | 0.2 |
| | जालना | | | | | | | 0.1 | 0.2 | 0.2 | 0.1 | 0.2 |
| | बीड | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.2 | 0.1 | 0.1 | 0.2 |
| | नांदेड | | | | | | | 0 | 0 | 0 | 0.1 | 0 |
| | परभणी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0 | 0.1 | 0.1 | 0.1 |
| | हिंगोली | | | | | | | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0 |
| | बुलढाणा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.1 | 0.2 | 0.1 | 0.1 |
| | अकोला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0 |
| | वाशीम | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0 |
| | अमरावती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.2 | 0.1 | 0 |
| | यवतमाळ | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.2 | 0 |
| | वर्धा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.2 | 0.3 | 0 |
| | नागपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.1 | 0.1 | 0 |
| | चंद्रपूर | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| पावसाचे प्रमाण आणि रंग कोड | 0.1 to 2.4 मिमी | 2.5 to 15.5 मिमी | 15.6 to 64.4 मिमी | 64.5 to 115.5 मिमी | 115.6 to 204.4 मिमी |
|---|---|---|---|---|---|
| पावसाची श्रेणी | खूप हलका पाऊस | तुरळक पाऊस | मध्यम स्वरूपाचा पाऊस | मुसळधार पाऊस | अति मुसळधार पाऊस |

**पीक स्थिती:**

**अकोला येथे,** पेरणी केलेल्या तारखांवरून पीक बोंड फुटण्याच्या आणि वेचणीच्या अवस्थेत आहे. वेचणी सुरू आहे. कीटकनाशकांची फवारणी करण्यात आली आहे. काही शेतांमध्ये पानांवर ठिपके आठळून आले आहे.

**नांदेड येथे,** पेरणी केलेल्या तारखांवरून कापूस बोंड परिपक्वता आणि वेचणीच्या अवस्थेत आहे. वेचणी सुरू आहे. पिक संरक्षणाच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. शेतात तणांचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. शेतात पांढरी माशी

आणि गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आढळून आला आहे. बोंड कुजण्याचा प्रादुर्भावही नोंदविण्यात आला आहे.

**राहुरी येथे** कापूस पिक बोंड फुटण्याच्या आणि वेचणीच्या अवस्थेत आहे. वेचणी सुरू आहे. रसशोषक कीटकांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा कमी आहे, परंतु गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त नोंदविण्यात आला आहे. टी.एस.व्ही. मुळे २८ ते ४० टक्के नुकसान आढळले आहे. खालच्या पानांच्या थरात बोंड कुजण्याचा प्रादुर्भावही नोंदविण्यात आला आहे.

**पीक सल्ला:**

अकोला येथे, शेतकऱ्यांना कापसाची स्वच्छ वेचणी करण्यास प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात येतो. कापूस पिकाच्या बोंड विकासाच्या अवस्थेत कापसाचा पिकाच्या नंतरच्या टप्प्यात पानांचा लालसरपणा टाळण्यासाठी १% युरिया आणि १% मॅग्नेशियम सल्फेटची फवारणी करावी. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त म्हणजे सलग तीन रात्री प्रति सापळा ५ ते ८ पतंग अथवा हिरव्या बोंडांपैकी ५ ते १०% बाधित असल्यास, फेनव्हॅलरेट २० ईसी @ २०० मिली किंवा लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रिन ५ ईसी @ २०० मिली किंवा सायपरमेथ्रिन १० ईसी @ २५० मिली किंवा सायपरमेथ्रिन २५ ईसी @ १०० मिली किंवा डेल्टामेथ्रिन २.८ ईसी @ २०० मिली किंवा अल्फामेथ्रिन १० ईसी @ १२० मिली किंवा फेनप्रोथ्रिन १० ईसी @ ३०० मिली प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. पानांवरील बुरशीजन्य डाग आणि बाहेरील बोंड कुज या रोगांच्या नियंत्रणासाठी अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनॅझोल ११.४% एससी @ १० मिली किंवा प्रॉपिकोनॅझोल २५ ईसी @ १० मिली किंवा थायोफानेट मिथाइल ७० डबल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डबल्यूपी @ ४ ग्रॅम किंवा (कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी) @ २५ ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ एससी @ १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डबल्यूपी @ २५ ग्रॅम किंवा (मेटिरॅम ५५ % + पायराक्लोस्ट्रोबिन ५% डबल्यूजी) @ २० ग्रॅम किंवा (फ्लक्सापायरॉक्सॅड १६७ ग्रॅ/लि + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅ/लि एससी) @ ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. करपा (ग्रे मिल्ड्यू) रोग आढळल्यास अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% डबल्यू/डबल्यू + डिफेनोकोनॅझोल ११.४% डबल्यू/डबल्यू एससी @ १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी @ २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**नांदेड येथे** शेतकऱ्यांना सल्ला देण्यात येतो की, प्रत्येक वेचणीतील कापूस (कापसाचे ढीग) वेगवेगळे साठवावेत. साठवणुकीपूर्वी कापूस सावलीत चांगला वाळवावा. स्वच्छ आणि सुरक्षित कापूस वेचणीसाठी कापूस तोडणी ॲप्रन वापरावा. गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (ETL) जास्त म्हणजे सलग तीन रात्री प्रति सापळा ५ ते ८ पतंग अथवा हिरव्या बोंडांपैकी ५ ते १०% बाधित असल्यास, फेनव्हॅलरेट २० ईसी @ २०० मिली किंवा लॅम्ब्डा-सायहॅलोथ्रिन ५ ईसी @ २०० मिली किंवा सायपरमेथ्रिन १० ईसी @ २५० मिली किंवा सायपरमेथ्रिन २५ ईसी @ १०० मिली किंवा डेल्टामेथ्रिन २.८ ईसी @ २०० मिली किंवा अल्फामेथ्रिन १० ईसी @ १२० मिली किंवा फेनप्रोथ्रिन १० ईसी @ ३०० मिली प्रति एकर या प्रमाणात फवारणी करावी. पानांवरील बुरशीजन्य डाग आणि बाहेरील बोंड कुज या रोगांच्या नियंत्रणासाठी अझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% + डिफेनोकोनॅझोल ११.४% एससी @ १ मिली किंवा प्रॉपिकोनॅझोल २५ ईसी @ १ मिली किंवा थायोफानेट मिथाइल ७० डबल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डबल्यूपी @ ०.४ ग्रॅम किंवा (कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डबल्यूपी) @ २.५ ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ एससी @ १ मिली किंवा प्रोपिनेब ७० डबल्यूपी @ २.५ ग्रॅम किंवा (मेटिरॅम ५५ % + पायराक्लोस्ट्रोबिन ५ % डबल्यूजी) @ २ ग्रॅम किंवा (फ्लक्सापायरॉक्सॅड १६७ ग्रॅ/लि + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ ग्रॅ/लि एससी) @ ०.६ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कापसाची कापणी टाळावी आणि दुसऱ्या तोडणीनंतर पीक पूर्णपणे नष्ट करावे.

**राहुरी येथे,** शेतकऱ्यांना सल्ला देण्यात येतो की सूर्यप्रकाश चांगला असताना आणि बोंडं पूर्णपणे फुटल्यानंतर ती नीट

वाळवून कापूस तोडणी करावी. नीट उघडलेली बोंडं आणि खराब/दोषग्रस्त बोंड वेगवेगळी तोडून त्या वेगवेगळ्या कोरड्या ठिकाणी साठवाव्यात. रब्बी हंगामासाठी पीक शक्य तितक्या लवकर संपवावे. शेवटच्या तोडणीनंतर मेंढ्या व शेळ्या यांना शेतात चरण्यासाठी सोडल्यास गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव पुढील हंगामात जाण्याची शक्यता कमी होते. शक्य असल्यास श्रेडर मशीनचा वापर करून कापसाच्या काड्या चिरडून जमिनीत मिसळाव्यात. ज्या शेतकऱ्यांनी अजून तोडणी पूर्ण केलेली नाही, त्यांनी पूर्णपणे खुले झालेल्या बोंडांची स्वच्छ तोडणी करावी. गुलाबी बोंडअळीने बाधित व निर्बाधित बोंडं वेगवेगळी तोडून कोरड्या ठिकाणी स्वतंत्रपणे साठवावीत, ज्यामुळे बाजारात चांगला भाव मिळण्यास मदत होते. तसेच शेतातील रोगट बोंडं व पिकाच्या अवशेषांचे संकलन करून नाश करावा.